# शासकीय तंत्रनिकेतन खामगांव

जलंब रोड, खामगांव-४४४३०३, जिल्हा-बुलढाणा. (महाराष्ट्र)

दूरध्वनी : ०७२६३-२९५०११ (प्राचार्य)
०७२६३-२९५०२२ (कार्यालय)

ई-मेल : office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in
संकेतस्थळ : www.gpk.edu.in

जा.क्र.: शा.तं.नि.खा./आस्था/वैद्य.शिबीर सूचना/२०२३/५८०,
दिनांक: ४/३/२०२३.

## महत्वाची सूचना

आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थिनींना माहित असेलच की, दिनांक ८/३/२०२३ बुधवार रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व ठिकाणी महिलांसाठी विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने जागतिक महिला दिवसाचे औचित्य साधून सद्या सुरु असलेल्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आपल्या संस्थेतील पाचही विद्याशाखेच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेशित एकूण ५१८ **विद्यार्थिनींसाठी (मुलींसाठी) एक-दिवसीय नि:शुल्क आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबीर** हे शासकीय तंत्रनिकेतन खामगांव माजी-विद्यार्थी संघटना (नोंदणी क्र.: महा/५२०/२०१९, दि. २०/१२/२०१९) व पंचशील होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय खामगांव यांच्या संयुक्त विद्यमाने **दिनांक ८/३/२०२३ बुधवार रोजी आपल्या संस्थेतील भारत रत्न एम. विश्वेश्वरय्या दालन येथे सकाळी ११:०० ते २:०० वाजे पर्यंत** घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

तरी संस्थेतील सर्व विद्यार्थिनींना (मुलींना) सूचित करण्यात येते की, सदरील दिवशी संस्थेत उपस्थित राहून शिबिरात सहभाग नोंदवावे आणि नि:शुल्क आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबीराचा लाभ घ्यावा.

04/03/23

(डॉ.स.श्री.प्रभुणे)
**प्राचार्य,**
**शासकीय तंत्रनिकेतन खामगांव**

**प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव..**

१) सर्व विभाग प्रमुख / नियंत्रण अधिकारी - स्थापत्य अभि., यंत्र अभि., विद्युत अभि., अणुविद्युत व संचार अभि., संगणक अभि., उपयोजित यंत्रशास्त्र, उपयोजित विज्ञान, कर्मशाळा, ग्रंथालय विभाग.
२) कुलमंत्री - मुलांचे व मुलींचे वसतिगृह.
३) श्री.रा.ह.जवकार, स्थानिक कार्यालय प्रतिनिधी प्रमुख, शासकीय तंत्रनिकेतन खामगांव माजी-विद्यार्थी संघटना यांना विनंती करण्यात येते की, सदरील शिबिरासाठी आवश्यक बैठक व्यवस्था आणि तपासणीसाठी प्रतिनियुक्त करण्यात येणारे पंचशील होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची चहा-पाणी तसेच मध्यान्ह भोजनाची व्यवस्था आपल्या संघटनेमार्फत करण्यात यावी.
४) श्री.स.रा.सोनी, समन्वयक, शासकीय तंत्रनिकेतन खामगांव माजी-विद्यार्थी संघटना तथा अधिव्याख्याता स्थापत्य अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव.
५) श्रीमती.अ.प.अहिर, अध्यक्ष, महिला विकास समिती, शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव.
६) श्री.रा.क.मंत्री, उपाध्यक्ष, जिमखाना, शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव.
७) श्री.आंबटकर, प्रोग्रामर, शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव यांना संस्थेच्या संकेस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.
८) संस्थेतील मुख्य सूचना फलकावर प्रदर्शित करण्यासाठी.